**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०६ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देश आणि राज्यभरात आज रामनवमीचा उत्साह, अयोध्येत राममंदिरात विशेष किरणोत्सव.**
2. **भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त नागपूरमध्ये भाजपा महानगर कार्यालयाचे भूमिपूजन.**
3. **वक्फ सुधारणा विधेयक-२०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी.**
4. **बंजारा काशी पोहरादेवी या पवित्र स्थळाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**

रामनवमी-शुभेच्छा संदेश

आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतल्या राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या राममंदिरांमध्ये दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा साजरा झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत भाविक येत आहेत. देशभरात ठिकठिकाणी भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रा देखील काढल्या जात आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमी आपल्याला धर्म, न्याय आणि कर्तव्य भावनेची जाणीव करून देते असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर भगवान श्रीरामांचे आशीर्वाद आपल्या सर्वांवर राहावेत आणि आपल्याला मार्गदर्शन करत राहोत, अशी इच्छा पंतप्रधानांनी व्यक्त केली आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान राम हे केवळ एक पूजनीय देवता नाहीत, तर एक राष्ट्रीय प्रतीक असून प्रभू श्रीराम यांनी उपदेश केलेल्या मूल्यांचं पालन आणि जतन केलं पाहिजे, असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

पंबन रेल्वे पूल

गेल्या दहा वर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज तमीळनाडूत रामेश्वरम इथं मुद्रावरच्या उघडता येणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्‌घाटनासह विविध प्रकल्पांचं उद्‌घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर आयोजित सभेला संबोधित करताना ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवल्याचं त्यांनी सांगितलं. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असल्याचं ते म्हणाले, यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर मुंबईतील अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांची उदाहरणं मांडली. पंतप्रधानांच्या हस्ते आज

उद्घाटन झालेल्या पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पूल उभारला आहे. या नवा रेल्वेपुलामुळे रामेश्वरमची चेन्नईसोबतची दळणवळणीय जोडणी सुधारेल, आणि प्रवासी आणि मालवाहतुकीसह पर्यटन क्षेत्रालाही लाभ होईल, असं ते म्हणाले.

भाजप स्थापनादिन

भारतीय जनता पार्टी आज आपला ४६ वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त वरिष्ठ भाजप नते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतानाच देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांनीही पक्ष स्थापनादिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त नागपूरमध्ये महाल परिसरातील टिळक पुतळ्याजवळच्या भाजपा महानगर कार्यालयाच्या भूमिपूजन करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. याप्रसंगी गडकरी यांनी **1980** मध्ये स्थापन झालेल्या भाजपाच्या प्रवासाचा धांडोळा उपस्थितांसमोर मांडला.

***पाहता पाहता 44 वर्षाचा हा इतिहास हा अनेक चांगल्या आणि वाईट गोष्टीच्या स्मृतीचा इतिहास आहे. पक्षाला अनेक संकटातून जावं लागलं. अनेक वेळा संघर्ष करावा लागला आणि त्या सगळ्यांमधून तावुन सुलाखून उत्तम यश मिळून आज आपण चांगल्या स्थितीमध्ये आहोत. आज खऱ्या अर्थाने आपण सर्वव्यापी शक्तिशाली आणि जगातली सगळ्यात मोठा राजकीय पक्ष म्हणून आज आपल्याला मान्यता मिळालेली आहे. हा जो पक्ष आहे हा व्यक्ती परिवाराचा पक्ष नाही आहे हा विचाराधिष्ठित पक्ष आहे.***

याप्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की **25** वर्ष या महानगर कार्यालयासाठी नागपूर भाजपच्या कार्यकत्यांनी खूप प्रयत्न केले. या कार्यालयाला आपण पाच लाख रुपये देणगी एक कार्यकर्ता म्हणून देत आहोत अशीच मदत सर्व कार्यकर्त्यांनी करावी असा आवाहन त्यांनी केलं.

आदिवासी सौरग्राम

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातलं सादागड-हेटी हे गाव राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम ठरलं आहे. केवळ २० दिवसांत सर्व अडचणी दूर करून महावितरण -जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनानं या गावात शून्य वीजबिल साध्य केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेतील प्रति

किलोवॅट ३० हजार रुपये अनुदानाचा लाभ घेत गावातील १९ घरांच्या छतावर प्रत्येकी १ किलोवॅटचे सौर प्रकल्प आणि शाळेसाठी विना-अनुदानित तत्वावर १ किलोवॅटचा स्वतंत्र सौर प्रकल्प अशी एकंदर २० किलोवॅट क्षमतेची सौर यंत्रणा बसवण्यात आली आहे. यामुळे गावात दर महिन्याला सरासरी २४०० युनिटची वीज निर्मिती होणार आहे.

किरणोत्सव अयोध्या

अयोध्येतल्या राम मंदिरात आज दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. रामलल्लाच्या कपाळावर सूर्याच्या किरणांनी टिळक लावल्यानंतर श्रीरामांना छपन्न भोग अर्थात नैवेद्य दाखवण्यात आला. राम जन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. याशिवाय आज संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. प्रभू रामचंद्राच्या जन्मोत्सवानिमित्त आज नागपुरात श्री पोद्दारेश्वर राम मंदिरातून श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा काढण्यात आली. मंदिराच्या प्रांगणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्तेप्रभू श्रीराम, सीतामाता व लक्ष्मणाच्या- मूर्तीचे प्रथम पूजन करण्यात आले, यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, व सर्वपक्षीय आमदारांच्या हस्ते श्रीराम पंचायतनाचे पूजन करण्यात आले. या नंतर शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. या शोभायात्रेत ९० आकर्षक चित्रस्थ सहभागी झाले होते. यात स्केटींग पथक, प्रतिहारी दल, अश्वमेधाचा घोडा, शंखनाद दल, भजन मंडळी, आदिवासी नृत्य, रामायण मंडळ, राम संकीर्तन दल, जस गायन आदींसह, बांकेबिहारी दर्शन, महालक्ष्मी जगदंबा कोराडी दर्शन, पंचमुखी हनुमान, भक्तीलीन हनुमान हे प्रमुख चित्ररथ भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. चित्ररथ पाहण्यासाठी नागरिकांनी आपल्या चिमुकल्यांसह शोभायात्रेच्या मार्गावर गर्दी केली होती. शोभायात्रेच्या मार्गात भाविकांसाठी विविध संस्था व संघटनांनी महाप्रसाद आदींचे वितरण करण्यात आले.

वक्फ विधेयक

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. गेल्या आठवड्यात लोकसभेत २८८ विरुद्ध २३२ मतांनी तर राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ मतांनी हे विधेयक मंजूर झालं होतं. वक्फ मालमत्ता व्यवस्थापनात असलेला पारदर्शकतेचा अभाव या नव्या कायद्यामुळे दूर होणार आहे. वक्फच्या नोंदींचं डिजिटायजेशन करणं, वक्फ मालमत्तांचं ऑडिट करणं, मालमत्तेचं सर्वेक्षण पूर्ण करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. नव्या सुधारणेनुसार वक्फ बोर्डात मुस्लिम समुदायातल्या मागास घटकांना आणि महिलांना प्रतिनिधित्व दिलं जाईल. तसंच केंद्रीकृत पोर्टलद्वारे वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन केलं जाईल.

पोहरादेवी

बंजारा समाजाचा इतिहास शौर्य, पराक्रम आणि त्यागाचा आहे. बंजारा काशी पोहरादेवी या पवित्र स्थळाच्या विकासासाठी राज्य शासनाने नंगाराभवन, संस्कृती परंपरेचे दर्शन घडविणारे संग्रहालय अशी अनेक कामे पूर्ण केली. येथील उर्वरित कामेही लवकरच पूर्ण केली जातील. निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.श्रीराम नवमी आणि संत सेवालाल महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा वाशीम जिल्ह्यातील बंजारा काशी पोहरादेवी येथे झाला. काही तांत्रिक अडचणींमुळे मुख्यमंत्री कार्यक्रमस्थळी पोहोचू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी कार्यक्रमाला दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित राहून सर्वांशी संवाद साधला.

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात हैदराबाद इथं संध्याकाळी साडेसात वाजता सामना होणार आहे. काल चंदीगड इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं पंजाब किंग्जचा ५० धावांनी पराभव केला. तत्पूर्वी काल दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्जचा २५ धावांनी पराभव केला.

हवामान

आज विदर्भात चंद्रपूर इथे ४१ पूर्णांक ८ दशांश सेल्सिअस अंश इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली. तर नागपुरात ४० पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. चंद्रपूर आणि गडचिरोली इथे विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला आहे.

*****